पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा.महिला व बालकल्याण समिती

**कार्यपत्रिका क्रमांक ११**

**सभावृत्तांत**

दिनांक : ०८/०१/२०१४ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०८/०१/२०१४** रोजी दुपारी **२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. लोंढे शुभांगी संतोष - सभापती
२) मा. तापकीर अनिता मच्छिंद्र
३) मा. सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
४) मा. पालांडे सुजाता सुनिल
५) मा. नेटके सुमन राजेंद्र
६) मा. गोफणे अनुराधा देविदास
७) मा. थोरात वनिता एकनाथ
८) मा. भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
९) मा. विमलताई सुरेश जगताप

याशिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.ऐवले – प्र.समाज विकास अधिकारी, मा.जगदाळे – सहा.प्रकल्प अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत ज्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात त्यामध्ये सुधारित बदल करणेबाबत.

विषय क्र.२) टेरेस गार्डन प्रशिक्षणाबाबत – मा.सुजाता पालांडे, मा.सुमन नेटके यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) महानगरपालिकेतील महिला कर्मचा-यांना Child Care leave लागू करणेबाबत – मा.अनुराधा गोफणे, मा.प्रतिभा भालेराव यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) बचत गटातील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंची विक्री प्रदर्शन एच.ए.मैदान, नेहरुनगर ऐवजी पी.डब्लू.डी.ग्राऊंड सांगवी येथे आयोजित करणेबाबत – मा.अनुराधा गोफणे, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये राबविणेबाबत – मा.प्रतिभा भालेराव, मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) महिला बचत गटांनी राबविलेल्या उपक्रमाचे स्पर्धा व प्रदर्शनाचे आयोजन करणेबाबत – मा.अनुराधा गोफणे, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) भोसरी गावठान स.नं.१ या ठिकाणी दोन दिवसीय बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करणेबाबत – मा.प्रतिभा भालेराव, मा.वनिता थोरात यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या शाळांमधील इ.८ वी मध्ये शाळेत गुणानुक्रमे प्रथम व द्वितीय आलेल्या मुलींना प्रोत्साहनात्मक शैक्षणिक सहलीचे आयोजन करणेबाबत – मा.अनुराधा गोफणे, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९) "पवनाथडी जत्रा"स्टॉल वाटप समितीची स्थापना करणेबाबत – मा.वनिता थोरात, मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक **१३/११/२०१३, २२/११/२०१३ २७/११/२०१३, ११/१२/२०१३ व २६/१२/२०१३** रोजी झालेल्या सभेचा ( **कार्यपत्रिका क्र.१०** ) सभावृत्तांत कायम करणेत्त आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला</u> -**

ठराव क्रमांक – १७ | विषय क्रमांक – १

दिनांक – ०८/०१/२०१४ | विभाग – नागरवस्ती विकास योजना

सुचक – मा.सुमन नेटके | अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नावियो/०३/कावि/१६१/२०१३, दि.३०/१२/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत ज्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात त्यामध्ये काही योजना बंद करणे, काही योजनांमध्ये सुधारणा करणे व काही नविन योजना सुरु करणे प्रस्तावित असून महिला बालकल्याण योजनेतील विविध कल्याणकारी योजनेमध्ये सुधारित नवीन योजना सुरु करणेकामी प्रस्तावा सोबतचे प्रपत्र अ नुसार अ.क्र.१ ते १० योजनांना मान्यता घेणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १८ विषय क्रमांक – २

दिनांक – ०८/०१/२०१४

सुचक – मा.सुजाता पालांडे अनुमोदक – मा.सुमन नेटके

संदर्भ:- मा.सुजाता पालांडे, मा.सुमन नेटके यांचा प्रस्ताव –

संपूर्ण पिंपरी चिंचवड शहरामध्ये महिलांसाठी टेरेस गार्डन प्रशिक्षण घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १९ विषय क्रमांक – ३

दिनांक – ०८/०१/२०१४

सुचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.प्रतिभा भालेराव

संदर्भ:- मा.अनुराधा गोफणे, मा.प्रतिभा भालेराव यांचा प्रस्ताव –

केंद्र शासनाकडील सहावा वेतन आयोग राज्य शासनाच्या शिफारशींसह महानगरपालिकेसाठी लागू करण्यात आलेला आहे. सदर अहवालात Child Care leave विषयक तरतूदही नमूद आहे व वेतन आयोगानुसार केंद्रशासनाच्या आखत्यारितील सर्व विभागातील महिला कर्मचा-यांसाठी Child Care leave सुरु करणेत आलेली आहे. तथापि सदर रजा महानगरपालिकेसाठी लागू करणेत आलेल्या वेतन आयोगात वगळणेत आलेली आहे. महानगरपालिकेत महिला कर्मचा-यांची संख्या मोठया प्रमाणात आहे. मुलं वाढविताना " आई " म्हणून महिलांची अतिशय महत्वाची भूमिका असते याबाबत दुमत नाही. मुल वाढत असतांना अनेक प्रसंगी पालकांनी त्यांच्याबरोबर असण्याची नितांत आवश्यकता असते. त्यातूनही अशा प्रसंगी आई बरोबर असल्यास मुलांनाही तणाव राहत नाही. परंतु देय रजांची संख्या कमी असल्याने नोकरी करणा-या महिलांना मुलांबरोबर राहणे शक्य होत नाही. सहाव्या वेतन आयोगात अशा प्रकारची रजा मुलांच्या आजारपणात, तसेच परीक्षांच्यावेळी आवश्यक असल्याने लागू करण्यात आलेली आहे. आजची मुलं उद्याची जबाबदार नागरिक आहेत. देशाचे भवितव्य त्यांचे हाती आहे. आजारपणात दुर्लक्ष झाल्याने मुलांमध्ये शारिरीक तसेच मानसिक व्याधी राहून गेल्याने निर्माण होणारी पिढी दुर्बल असण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा वेळी आई मुलांबरोबर असल्याने सदर बाब टाळणे शक्य आहे. तसेच परिक्षेच्या कालावधीत मुलांमध्ये तणाव वाढण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत मुले निराशेच्या आहारी जाऊन आत्महत्या करण्याचे प्रमाणही सध्या वाढलेले दिसून येते. अशावेळी आई मुलांबरोबर असल्यास अशी कृत्ये करण्यापासून मुले परावृत्त होऊ शकतात. परिक्षेच्या कालावधीत आई बरोबर असल्याने मुले मानसिक ताणतणाव विरहित राहून आत्मविश्वासपूर्वक परिक्षेस उपस्थित राहतील. त्यामुळे गुणात्मक दर्जा वाढण्यास मदत होईल. या प्रमाणे काही प्रसंगी केवळ आई बरोबर असल्याने भविष्यात निर्माण होणा-या भावी पिढीला फायदे होणार आहेत. सबब केंद्र शासनाकडील Child Care leave बाबतचे सहाव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने दि.११ सप्टें.२००८ रोजीचे परिपत्रक व त्या संबंधी वेळोवेळी होणा-या सुधारणांसह पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत काम करीत असलेल्या महिलांसाठीही लागू करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २० विषय क्रमांक – ४

दिनांक – ०८/०१/२०१४

सुचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.अनुराधा गोफणे, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागाच्यावतीने दिनांक ३०/०१/२०१४ ते ०२/०२/२०१४ या कालावधीत बचत गटातील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंची विक्री, प्रदर्शन एच.ए.मैदान, नेहरुनगर ऐवजी पी.डब्लू.डी.ग्राऊंड, सांगवी येथे आयोजित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २१ विषय क्रमांक – ५

दिनांक – ०८/०१/२०१४

सुचक – मा.प्रतिभा भालेराव अनुमोदक – मा.शकुंतला बनसोडे

संदर्भ:- मा.प्रतिभा भालेराव, मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव –

महिला व बालकल्याण समिती सभा सदस्य ठराव क्रमांक ४ दि.१०/०७/२०१३ व मा.स्थायी समिती सभा सदस्य ठराव क्र.३९१८, दि.२७/०८/२०१३ नुसार सन २०१३-१४ साठीच्या महिलांसाठीच्या ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रमाच्या आयोजनाकामी मे.अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे यांना दिनांक ३१/०७/२०१४ अखेर पर्यंतच्या कालावधीत काम करण्यासाठीची व एकूण १२ विषयांचा कालावधी, दर इ. प्रशिक्षणासंबंधीत आवश्यक त्या बाबींस व होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन मे.अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे यांचेमार्फत दि.१४/०७/२०१३ व दि.०४/०१/२०१४ रोजीच्या पत्रान्वये व त्या सोबतच्या अभ्यासक्रमास, शैक्षणिक अर्हतेस अनुसरुन महिलांना जास्तीतजास्त तांत्रिक कौशल्य प्राप्त होण्याच्या दृष्टीने १) ॲडव्हान्स गिफ्ट आर्टीकल्स निर्मिती ( केमिकल फ्लॉवर, सिरॅमिक फ्लॉवर पॉट, ग्लास पेंटींग, स्टेन ग्लास पेंटिंग, फ्रेमिंग, पोस्टर फ्रेमिंग इ.) २) ब्युटी केअर ॲन्ड पार्लर मॅनेजमेंट, ३) विविध प्रकारचे खाद्य पदार्थ तयार करणे हे तीन विषय वगळता उर्वरित ९ विषयांचे प्रशिक्षण हे उपरोक्त नमुद ठरावाच्या कालावधीत घेणेस व उपरोक्त तीन विषयांचा प्रशिक्षण कालावधी खालील तक्त्यात नमुद प्रमाणे -

| अ.क्र. | कोर्ससचे (विषयाचे) नाव | मा. महिला व बालकल्याण समिती सभा सदस्य ठराव क्रमांक ४ दि.१०/०७/२०१३ व मा.स्थायी समिती सभा सदस्य ठराव क्र.३९१८, दि.२७/०८/२०१३ नुसार कालावधी | | वाढविण्यात येणारा सुधारीत कालावधी | |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | |
| | | कालावधी | तास | कालावधी | तास |
| १ | ॲडव्हान्स गिफ्ट आर्टीकल्स निर्मिती | ३० दिवस | ६० तास | ४५ दिवस | ९० तास |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | (केमिकल फ्लॉवर, सिरॅमिक फ्लॉवर पॉट, ग्लास पेंटींग, स्टेन ग्लास पेंटिंग, फ्रेमिंग, पोस्टर फ्रेमिंग इ.) | | | | |
| २ | ब्युटी केअर ऍ़न्ड पार्लर मॅनेजमेंट, | ६० दिवस | १२० तास | ७५ दिवस | १५० तास |
| ३ | विविध प्रकारचे खाद्य पदार्थ तयार करणे | ३० दिवस | ६० तास | ४५ दिवस | ९० तास |

तरी उपरोक्त नमूद तीन विषयांचा प्रशिक्षण कार्यक्रम रकाना क्र. ४ नुसारच्या कालावधीत घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २२ विषय क्रमांक – ६

दिनांक – ०८/०१/२०१४

सुचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.सुजाता पालांडे

संदर्भ:- मा.अनुराधा गोफणे, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील महिलांचे सबलीकरण व्हावे या उद्येशाने महिला बचत गटांना स्थापनेपासून त्यांच्या उद्योगापर्यंत महानगरपालिका सहकार्य करते. महिला बचत गटांना प्रोत्साहन देणेकामी महिला बचतगटांनी राबविलेल्या उपक्रमाचे स्पर्धा व प्रदर्शनाचे आयोजनाबाबत पुढील प्रमाणे आयोजन करण्यात यावे. १) स्पर्धा व प्रदर्शन कालावधी किमान १ ते १० फेब्रुवारी २०१४ असा असावा. २) पालिकेच्या महिला बालकल्याण विभागामार्फत शहरातील सर्व महिला बचत गटांना कार्यक्रमाबाबतची माहिती कळवावी. ३) स्पर्धेत सहभागी होण्यासाठी त्यांना किमान १० दिवसांचा वेळ द्यावा. ४) स्पर्धेत सहभागी होण्यासाठी फॉर्म भरुन घ्यावेत व त्यांना आपण केलेल्या उपक्रमाचे प्रदर्शनात सहभागी होण्याचे कळविणेत यावे. ५) प्रदर्शनात केलेल्या उपक्रमाचे फोटो अथवा प्रात्याक्षिके वस्तु स्वरुपात असावे. ६) प्रदर्शन शहराच्या मध्यभागी ( सर्वांना येणे जाणे सोयीचे ) असावे. ७) महिला बचत गटांनी केलेल्या प्रकल्पातून त्यांना मिळालेला फायदा व इत्यादींची माहिती देण्यास सांगणे प्रदर्शनाच्या ठिकाणी. ८) सदरील प्रदर्शनाची माहिती स्थानिक वर्तमानपत्रामध्ये प्रकाशित होण्यासाठी पत्रकार परिषदेचे आयोजन करावे. स्पर्धेतील स्पर्धकांना खालील प्रमाणे बक्षिसे देण्यात यावीत. १) प्रथम क्रमांक २१,०००/- रुपये, २) द्वितीय क्रमांक ११,०००/- रुपये, ३) तृतिय क्रमांक ५,०००/- रुपये, ४) उत्तेजनार्थ १) २,०००/- रुपये, २) २,०००/- रुपये, ३) २,०००/- रुपये प्रदर्शनाचे शेवटचे दिवशी बक्षिस वितरण समारंभ करणेचे धोरणास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – २३ विषय क्रमांक – ७

दिनांक – ०८/०१/२०१४

सुचक – मा.प्रतिभा भालेराव अनुमोदक – मा.वनिता थोरात

संदर्भ:- मा.प्रतिभा भालेराव, मा.वनिता थोरात यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबविण्यात येणा-या महिला बालकल्याण योजने अंतर्गत महिलांच्या विकासासाठी विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. तथापि बालकांसाठी देखील उपक्रम राबविण्यात यावा या हेतूने भोसरी गावठान सर्व्हे नं.१ या ठिकाणी दोन दिवसीय बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यास व या मेळाव्यात ४००० मुलांसाठी विविध प्रकारचे करमणुकीचे कार्यक्रम व खेळणी इ. समावेश करुन त्यासाठी येणा-या र.रु.१०,००,०००/- (अक्षरी र.रु.दहा लाख फक्त) चे खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २४ विषय क्रमांक – ८

दिनांक – ०८/०१/२०१४

सुचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.अनुराधा गोफणे, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबविण्यात येणा-या महिला बालकल्याण योजने अंतर्गत महिलांच्या विकासासाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. यामध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांमधील इ. ८ वी मध्ये शाळेत गुणानुक्रमे प्रथम व द्वितीय आलेल्या मुलींना प्रोत्साहनात्मक शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात यावे. सदरची सहल फेब्रुवारी २०१४ मध्ये केरळ / राजस्थान येथे जाणेकामी आयोजित करण्यात यावी. या सहलीमध्ये मनपा शाळेतील सध्या इ. ९ वी मध्ये शिकत असलेल्या व इ.८ वी मध्ये शाळेत प्रथम व द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या (मुख्याध्यापकांनी शिफारस केलेल्या) गुणवंत विद्यार्थिनी, महिला बाल कल्याण समितीच्या सर्व सदस्या, नागरवस्ती विकास विभागाकडील २ अधिकारी, २ शिक्षिका, १ शिपाई, इ. समावेश करण्यात यावा. तरी सदर सहलीचे आयोजन करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २५ विषय क्रमांक – ९

दिनांक – ०८/०१/२०१४

सुचक – मा.वनिता थोरात अनुमोदक – मा.शकुंतला बनसोडे

संदर्भ:- मा.वनिता थोरात, मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत बचतगटातील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ मिळावी या हेतूने दरवर्षी पवनाथडी जत्रेचे आयोजन करण्यात येते. यावर्षी पवनाथडी जत्रा दि.३०/०१/२०१४ ते ०२/०२/२०१४ या कालावधीत भरवण्यात येणार आहे. पवनाथडी जत्रेत स्टॉल मिळणेसाठी मागणी करणा-या महिला अर्जदारांना योग्यरित्या स्टॉल वाटप करणेबाबत खालीलप्रमाणे स्टॉल वाटप समितीची स्थापना करण्यास व या समितीमार्फत स्टॉल वाटप करणेस मान्यता देणेत येत आहे.

**स्टॉल वाटप समिती -**

१) मा.महापौर, २) मा.सभापती (महिला व बालकल्याण समिती), ३) मा.सहाय्यक आयुक्त (नावियो), ४) मा.समाज विकास अधिकारी (नावियो),

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**(लोंढे शुभांगी संतोष)**
**सभापती**
मा.महिला व बाल कल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ ३० /२०१४
दिनांक - १५ / ०१ /२०१४

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.